मुंब्रा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १२२ /२०२६ दि. १९/०६/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, मुंब्रा वाहतूक उपविभागाचे हद्दीत मुंब्रा रेल्वे स्टेशन ते शंकर मंदीर दरम्यान मुख्य रस्त्याच्या कडेला दोन्ही वाहीनीवर मोठया प्रमाणात वाहने अस्ताव्यस्तपणे उभी केल्याने मोठया प्रमाणात वाहतूकीस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे मुंब्रा शहरातील स्थानिक नागरीकांकडुन तक्रारी प्राप्त होत आहेत. मुंब्रा रेल्वे स्टेशन ते शंकर मंदीर दरम्यान मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी होत असल्यामुळे नागरीक, शाळकरी मुलांना वेळेवर कामचे ठिकाणी तसेच शाळेत पोहचण्यास वेळ होत असतो. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए./११६/सीआर/३७/टीआर,दि.२७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक अधिसूचना जारी करीत आहे. :—

अ.क्र.	पार्किंगचे ठिकाण	प्रकार	अंतर	वेळ
१	मुंब्रा रेल्वे स्टेशन ते शंकर मंदीर मुख्य रस्त्याचे दोन्ही बाजु पर्यत	नो पार्किंग झोन	१.९ कि.मी.	सकाळी ०६:०० वा. ते रात्रौ २२:०० वा. पावेतो

वर नमूद ठिकाणी **पार्किंग व्यवस्था** बाबत अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे/नवी मुंबई.
मा. आयुक्त, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ५, वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व पो.निरी. वाहतूक उपविभाग ठाणे.